नोंदणी व मुद्रांक विभाग
महाराष्ट्र शासन
# नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
नोंदणी व मुद्रांक विभाग
तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे-411001.
**फोन नं.** 020-26123826 **E-mail** – do9.igro@igrmaharashtra.gov.in , desk9est@gmail.com

---

क्र-का-9/आस्था-7/सेनि.अधिकारी/करार.नियुक्ती/जाहिरात/ 113 /2025 दिनांक :-25 /02/ 2025

## जाहिरात

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयात करार पध्दतीने राज्य शासकीय सेवेतील 1. सह जिल्हा निबंधक वर्ग-1 व मुद्रांक जिल्हाधिकारी व 2. सह जिल्हा निबधंक वर्ग-2/सह दुय्यम निबंधक वर्ग -2/ मुद्रांक उपअधिक्षक या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची नेमणूक करावयाची आहे. त्याकरिता पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

करार पध्दतीने भरावयाची पदे, त्यांची अर्हता, संख्या, याची माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता – 'अ'**

| अ.क्र. | सेवानिवृत्तांचे पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 1. | सह जिल्हा निबंधक वर्ग-1 व मुद्रांक जिल्हाधिकारी | 01 | राज्य शासकीय सेवेतून सह जिल्हा निबंधक वर्ग-1/ मुद्रांक जिल्हाधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी |
| 2. | सह जिल्हा निबंधक वर्ग-2/ सह दुय्यम निबंधक वर्ग-2/ मुद्रांक उपअधिक्षक | 01 | राज्य शासकीय सेवेतून सह जिल्हा निबंधक वर्ग-2/ सह दुय्यम निबंधक वर्ग-2 / मुद्रांक उपअधिक्षक या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी |

## तक्ता – 'ब'

**करार तत्वावर नेमण्यात येणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे कामाचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | पदनाम | विवक्षित कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| 1. | 1. सह जिल्हा निबंधक वर्ग-1 व मुद्रांक जिल्हाधिकारी<br><br>2. सह जिल्हा निबंधक वर्ग-2/ सह दुय्यम निबंधक वर्ग-2/ मुद्रांक उपअधिक्षक | महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम व नोंदणी अधिनियम मधील तरतुदीचा योग्य स्पष्टीकरण, अपील प्रकरणे आणि पुनरिक्षण प्रकरणांच्या संदर्भात मसुदा तयार करण्यास मदत करणे, रिट याचिकेत परिच्छेदानुसार उत्तर तयार करणेस मदत करणे त्याचबरोबर प्रतिज्ञापत्र-इन- उत्तर तयार करण्यासाठी मदत करणे इतर कार्यासनास न्यायालयीन प्रक्रियेबाबत प्रतिज्ञापत्र तयार करणेस मदत करणे वगैरे कामकाज करणे |

### अ) सर्वसाधारण सूचना

1) उपरोक्त पदासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याचा कालावधी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून दि. 05/03/2025 रोजी सायंकाळी 6.00पर्यंत आहे.

2) मुदतीत अर्ज करणाऱ्या अधिकाऱ्याची दि. 07/03/2025 रोजी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय तळमजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर पुणे- 01 येथे सकाळी 11.00 वाजता मुलाखत घेण्यात येईल. काही कारणास्तव मुलाखतीच्या वेळेत बदल झाल्यास तो अर्जदारास त्यांचे ई-मेलवर / भ्रमणध्वनीवर कळविण्यात येईल त्यासाठी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

3) मुलाखतीस उपस्थित रहाण्याबाबत उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

4) मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

5) उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

6) करार पध्दतीने नियुक्ती देताना 11 महिनेसाठी नियुक्ती देण्यात येईल. कामकाज व आवश्यकता विचारात घेऊन आवश्यकतेनुसार नियुक्तीचे नूतनीकरण करण्यात येईल.

7) सदर अधिकाऱ्यांचे पारिश्रमिक व वेतन सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक 17/12/2016 व दिनांक08.09.2023 च्या शासन तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल व त्याबाबत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक ,महाराष्ट्र राज्य पुणे या कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील.

8) निवड झालेल्या उमेदवारांना विहित केलेल्या नमुन्यात हमीपत्र द्यावे लागेल.

9) अपूर्ण अर्ज, स्वाक्षरी, फोटो नसलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.

**ब) अर्ज करण्याची पध्दत:-**

उमेदवाराने सोबतच्या अर्जाच्या नमुन्यात स्वतःचे संपूर्ण नांव ( आडनाव प्रथम), जन्म दिनांक, वय, लिंग (स्त्री / पुरुष), पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहीत) व मोबाईल क्रमांक, ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयाचे नांव, सेवानिवृत्तीचा दिनांक, शासकीय सेवेत असताना मिळालेले अंतिम वेतन व पदनाम तसेच सध्या मिळणारे निवृत्तीवेतन याबाबतचा तपशिल नमुद करुन मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे तळमजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर पुणे -411 001 यांचे नावे अर्ज दि.05/03/2025 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत पोहोचेल अशा रितीने कार्यालयात समक्ष सादर करावा. या अर्जाचा नमुना नोंदणी व मुद्रांक विभागाची वेबसाईट www.igrmaharashtra.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**अर्जासोबत खालील प्रमाणपत्रे स्वसांक्षाकित करुन जोडावीत.**

1) शासकीय संस्थेकडील सेवानिवृत्तीचा आदेश व ना-विभागीय चौकशी प्रमाणपत्राची प्रत.
2) महालेखापाल कार्यालयाकडून मंजूर निवृत्तीवेतन प्राधिकार पत्राची प्रत.
3) शैक्षणिक अर्हता धारण व इतर परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतच्या छायांकित प्रती.
4) अर्जावर पासपोर्ट आकाराचा फोटो साक्षांकित करुन चिकटवावा.
5) आधार व पॅनकार्ड प्रत.

**मुलाखत** :-

1) अर्ज सादर करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी दि. 07.03.2025 रोजी मुलाखतीस प्रत्यक्ष हजर रहावे.
2) **मुलाखतीचे ठिकाण** :- नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, तळमजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर पुणे- 411001
3) **मुलाखतीची वेळ** :- सकाळी 11.00 वाजता
4) मुलाखतीचे वेळी कागदपत्रांच्या मूळ प्रती व छायांकित प्रती सोबत आणाव्यात. मुलाखतीसाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही.

**क) सर्वसाधारण अटी व शर्ती.**

1. तक्ता 'अ' येथे नमूद पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो.
2. सेवानिवृत्त अधिकारी वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील .त्यामुळे 65 वर्षापेक्षा कमी वय असलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनीच अर्ज सादर करावेत.
3. तक्ता 'ब' येथे नमुद करण्यात आलेले पदाचे कामकाज करण्यास अधिकारी सक्षम असणे आवश्यक आहे.
4. सेवानिवृत्त अधिकाऱ्याविरूध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी, अथवा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसावी.

5. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक ,मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.
6. नियुक्त करावयाची सेवानिवृत्त अधिकारी इतर व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.
7. सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.
8. नियुक्त केलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस नियमित सेवेत घेण्याची अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.
9. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा सेवानिवृत्त अधिकारी यांच्या करार पध्दतीवर सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.
10. अशा सेवानिवृत्त अधिका-यांना वाहन अनुज्ञेय / उपलब्ध असणार नाही .तसेच अशा सेवानिवृत्त अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.
11. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.
12. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेले अधिकारी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नियंत्रणाखाली कार्यरत असतील.
13. करार पध्दतीने घेण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांना सोपविण्यात येणाऱ्या कामाचे स्वरूप नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अंतिम निर्णयाने ठरेल.
14. करार पध्दतीने घेण्यात येणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी यांची बैठक व्यवस्था उपलबध असलेल्या जागेनुसार करण्यात येईल.
15. अशा अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13 दिनांक 17/12/2016 मधील अटी व शर्ती लागू राहतील .

पदांची संख्या निवड प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहेत.

दिनांक :- /02/2025

Raul-

**रविंद्र बिनवडे** (भा.प्र.से.)
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**
25/2/2025

## अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज.

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वतःचे स्वसाक्षांकित छायाचित्र येथे चिकटवावे. |

अर्जदाराचा स्वसाक्षांकित फोटो

प्रति,

मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे
तळमजला, नविन प्रशासकीय इमारत,
विधान भवन समोर पुणे -411 001

**विषय**:- करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत.

**संदर्भ**:- आपली जाहिरात क्र. ___________दिनांक _________________

महोदय,

मी आपल्या कार्यालयात 1. सह जिल्हा निबंधक वर्ग-1 व मुद्रांक जिल्हाधिकारी किंवा 2. सह जिल्हा निबंधक वर्ग-2/ सह दुय्यम निबंधक वर्ग-2/ मुद्रांक उपअधिक्षक या संवर्गात करार पध्दतीने काम करू इच्छितो/इच्छिते.

1. पूर्ण नाव (प्रथम आडनाव) :-

2. पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता (मोबाईल नंबर व ई-मेल) :-

3. जन्म दिनांक :-

4. वय :-

5. स्त्री/पुरुष :-

6. कोणत्या पदावरुन सेवानिवृत्त झाले :-

7. कोणत्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले :-

8. सेवानिवृत्तीचा दिनांक :-

9. सेवानिवृत्तीच्या वेळेचे अंतिम वेतन :-

10. सध्या मिळणारे निवृत्ती वेतन :-

11. अर्जदाराविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू आहे काय? :-

12. अर्जदारास चौकशी अंती शिक्षा झाली आहे काय? :-

13. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-

14. अर्जदाराने त्यांच्या सेवा कालावधीत केलेल्या उल्लेखनीय कामाचा तपशील :-

15. अर्जदाराने त्यांच्या सेवाकालावधीत केलेल्या कामाचा तपशील. :-

| पासून | पर्यंत | पदनाम | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

वरील माहितीच्या पुराव्यादाखल मी खालील साक्षांकित कागदपत्रे सोबत सादर करीत आहे. मूळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करीन.

1. शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे
2. सेवानिवृत्तीचा आदेश
3. खातेनिहाय चौकशी प्रलंबित नसलेचा दाखला / प्रमाणपत्र
4. आधारकार्ड व पॅनकार्ड

5. निवृत्तीवेतन प्राधिकारपत्र

मी प्रतिज्ञा पूर्वक नमूद करतो की, वरील सर्व माहिती सत्य आहे. ही माहिती चुकीची आढळून आल्यास होणाऱ्या कारवाईस मी स्वतः जबाबदार राहीन, याची मला जाणीव आहे. विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी करार पध्दतीने जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाणः- अर्जदाराची सही व नाव

दिनांकः-

सोबत :- 1)
2)
3)